ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 4 | DECEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# वामन होवाळ यांच्या 'येळकोट' मधील सामाजिक जाणिवा

प्रा.अनिलकुमार दडमल
मराठी विभाग प्रमुख, गुलाम नबी आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
बार्शीटाकळी, जि.अकोला.

**प्रास्ताविक :**



दलित साहित्याच्या प्रवाहाने मराठी साहित्याच्या अंतर्बाह्य विश्वास आमूलाग्र बदल केला. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या त्रिसूत्रीला केंद्रस्थानी ठेवून दलित साहित्यात विविध साहित्यप्रकार मोठ्या ताकदीने लिहिले गेले आहेत. माणसाला माणूसपणाची भावना देण्याचे कार्य दलित साहित्यामुळे झालेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या दलित तरुणांचा शब्दाविष्कार दलित साहित्यातून झाला आहे.

कथा सांगणे व ऐकणे हा माणसाचा स्थायीभाव आहे. या अनुषंगाने मराठी कथेला दीर्घ व समृद्ध परंपरा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात दलित साहित्यात कादंबरी, कविता, आत्मकथा बरोबरीनेच कथा ही अत्यंत सशक्तपणे लिहिली गेली आहे. दलित कथा लेखनाच्या पहिल्या पिढीतील कथाकाराच्या आदर्शाला सामोरे ठेवूनच नव्हे, तर त्यांच्या समकालीनच वामन होवाळ यांनीही सशक्त दलित जीवनानुभव आपल्या कथालेखनातून शब्द गोचर केले आहेत. ग्रामीण दलित जीवनाची पार्श्वभूमी घेऊन, स्वातंत्र्याचे वारे पिलेली नवशिक्षित तरुण मंडळी आणि परंपरागत जीवनाला अनुसरून जगणारी वृद्ध माणसं होवाळांच्या कथेतून प्रभावीपणे साकार होतात.

वामन होवाळ यांच्या नावे अनुक्रमे बेनवाड, येळकोट, वारसदार, वाटाआडवाटा व ऑडिट असे पाच कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या येळकोट, वारसदार व ऑडीट या कथासंग्रहाला महाराष्ट्र राज्य शासनाचे उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या एकूणच कथा विश्वातून सामाजिक जाणिवांचे आविष्करण झालेले आहे. होवाळांचे कथाविश्व दलित ग्रामीण साहित्याला समृद्ध करणारे आहे. त्यांनी आपल्या प्रतिभा संपन्नतेच्या जोरावर व भाषाउपयोजन आणि निवेदनशैलीच्या आधारे समकालीनात आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

होवाळ यांच्या येळकोट या कथासंग्रहातून अभिव्यक्त झालेल्या जीवन अनुभवातून त्यांच्यातील सामाजिक बांधिलकीचे वेगळेपण विषद होते. समाजाप्रती आणि माणसाप्रती असणारी कणव अभिव्यक्त होते. सामाजिक जीवनात बदल घडवून आणण्यासाठी लेखकांच्या कथांतून आश्वासक विचारांची मांडणी झालेली आहे. त्यांच्या कथालेखनातील या पैलुवर भाष्य करताना डॉ.रावसाहेब कसबे लिहितात,''आज आपल्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात अराजक परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक राजकीय पक्षांच्या गटातटांचे येळकोट भरभरून होत आहेत. सांस्कृतिक क्षेत्रही त्याला अपवाद नाही. तिथेही जाती, पोटजातीनिहाय संमेलनाच्या नावाने येळकोट होतच असतात. वामनराव आज तरी या साऱ्या अराजकाकडे तटस्थपणे पाहत आहेत. येळकोट करणाऱ्या एखाद्यात सामील होण्याऐवजी त्यांना या

अराजकाची चिकित्सा करावीशी वाटते. माझ्या दृष्टीने ही फार मोठी आश्वासक अशी बाब आहे.''[१] डॉ. कसबे यांनी केलेल्या विधानातून वामन होवाळ यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची नेमकी जाणीव प्रतिबिंबित होते.

वामन होवाळ यांनी जे अनुभवलं तेच गोष्टीरूपाने लिहिलं आहे. त्यामुळे त्यांची कथा ही सामान्यांची कथा होते. त्यांच्या कथालेखनातून समाज उद्धाराची तळमळ व्यक्त होते. येळकोट मधील अनेक कथा सामाजिक जाणिवेने ओतप्रोत भरलेल्या आहेत. मानवी समाजात बदलत्या काळानुरूप अनेक स्थित्यंतरे होत आहेत. या स्थित्यंतराचे साक्षीदार असणारे होवाळ मात्र बदलाकडे अत्यंत तटस्थपणे पाहतात. मानवी समाजात होणाऱ्या बदलाचे चांगले—वाईट परिणाम येळकोट मधील अनेक कथांतून साकार होतात. होवाळांच्या येळकोट मधील कथांचे एक वेगळेपण असे आहे की, त्यांनी प्रचलित कथा लेखनाची वाट न चोखाळता आपली वेगळी वाट निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या या अभिव्यक्तीच्या वेगळेपणातच त्यांच्या समग्र मानवी समाजजीवनाचे हित दिसून येते. त्यांच्या या वेगळेपणाला अधोरेखित करताना डॉ.नागनाथ कोतापल्ले म्हणतात, ''ग्रामीण जीवनाबद्दल लिहूनही रूढार्थाने ते ग्रामीण लेखक नाहीत. हे जसे आपण पाहिले त्याच प्रमाणे ते दलित लेखक असूनही इतर दलित लेखकांनपेक्षा खूपच वेगळे आहेत. म्हणजे दलित माणसाच्या वाट्याला येणारी अवहेलना, दु:ख दारिद्र्य आणि छळ यांच्या कथांमधून येत नाही असे नाही, ते सारेच इतर दलित लेखकांप्रमाणेच येते. खरे म्हणजे त्यांच्या कथेमध्ये दु:खाच्या अनेक परी येतात. दलित असण्याचे, दरिद्री असण्याचे दु:ख तर येतेच पण त्यापलीकडे संपूर्ण समाज अंधश्रद्धेच्या गर्तेत खितपत पडलेला आहे, याचे दु:ख अधिक येते. किंबहुना, यातूनच साऱ्या दु:खाची निर्मिती होते असे त्यांना वाटते. त्यातूनच दलित माणसांबरोबरच सवर्ण माणसाकडेही ते सहानुभूतीने पाहतात. परंतु त्यांच्या साहित्याचे वेगळेपण त्यांच्या विनोद निर्मितीत आहे असे म्हणावे लागते. तेथेच ते इतर दलित लेखकापेक्षा वेगळे ठरतात.''[२] डॉ.कोत्तापल्ले यांच्या विवेचनावरून वामन होवाळ यांच्या वेगळेपणाचे स्वरूप अधोरेखित होते. कोणताही एकच एक दृष्टिकोन नजरेसमोर न ठेवता लेखन केल्यामुळे वामन होवाळ यांच्या कथांतील सामाजिक जाणिवेचे वेगळेपण निश्चित होते.

स्वातंत्र्यानंतर खेड्यात हळूहळू मोठ्या स्वरूपात बदल होत गेले. या बदलाला सामोरे जाणारा सामान्य वर्ग आणि त्याची होणारी सामाजिक अवहेलना आपल्या कथांतून प्राधान्याने टिपतात. यंत्रयुगाच्या संपर्कात आलेल्या खेड्याचे चित्र अक्कल हुशारी, धुराळा या कथांतून येते. तर शहरात असणारे राजकारण ग्रामीण भागात पोहोचल्यामुळे सामाजिक जीवनात झालेली उलथापालथ उद्घाटन आणि धुरळा या कथेतून अनुभवास येते. सामाजिक जीवनात होणारी उलथापालथ चितारण्याबरोबरच होवाळ मानवी स्वभावात, मनोवृत्तीत होणारी परिवर्तनाची जाणीवही तेवढ्याच कलात्मकतेने टिकतात. हुमान या कथेतून गाव खेड्यातील प्रेम सुलभ भावना चित्रित झाल्या आहेत. तर स्थळ कथेतून नातेसंबंधाची जुळवाजुळव समाजात कशी होते, त्यातील गमती जमतीसहित मांडली आहे. या कथांतून येणाऱ्या व्यक्तिरेखाही त्या काळातील सामाजिक परिस्थितीचे वास्तव वेगवेगळ्या अंगाने साकार करतात. बटू बेलदार, गंगा म्हातारी, नकुसा, सदा लव्हार, गणू कासार, राम गवंडी, विजू साळी, अनंता सुतार, दादू भट, चंदर शिंपी, गणा न्हावी आदी किती तरी पात्र सांगता येतील की, ती समाजातील वेगवेगळ्या जाती जमाती आणि सामाजिक व्यवसायाला घेऊन चित्रीत झाले आहेत. या सामाजिक जीवनातील विविधता रेखाटण्याबरोबरच मानवी प्रवृत्तीतील दुष्टपणा, बेरकीपणावरही ते प्रहार करतात. अशा माणसांमुळे समाजाची होणारी घुसमट ते फोडू पहात आहेत. एकूणच काय तर, ''त्यांना शोषणमुक्त समाज निर्माण करावयाचा आहे आणि या भूमिकेतून त्यांचा भर अन्य प्रकारच्या शोषणा बरोबरच श्रीमंत—गरीब या भेदावर अधिक असतो. त्यामुळेच त्यांच्या साहित्यात दारिद्र्याची वर्णने विपुल आढळतील.''[३] राजा ढाले यांनी होवाळांच्या कथा लेखनातील सामाजिक जाणिवेचे नेमकेपण अधोरेखित केले आहे.

वामन होवाळ यांच्या कथा लेखनाच्या प्रारंभ काळात सामाजिक जीवनात स्थित्यंतराचा प्रारंभ झालेला होता. समाज आपल्या अंगावरील जुनाट संस्काराची कात टाकून नाविण्याचा स्वीकार करु लागला होता. नवेपणाचा अंगीकार समाज करू लागला होता. या नवेपणातून वाट्याला येणाऱ्या शोषणाचेही

वास्तव किती भयावह होते ते होवाळ नेमकेपणाने पकडतात. होवाळ यांच्या समकालीन अनेक दलित कथाकारांनी सामाजिक जीवनाचे वास्तव आपल्या कथांतून मांडले आहे. परंतु, ते विनोदी अंगाने सामाजिक तसेच मानवी प्रवृत्तीवर भाष्य करणारे एकमेव कथाकार आहेत. त्यांच्या या वेगळेपणावर भाष्य करताना डॉ. अविनाश सांगोलकर म्हणतात, ''होवाळ यांनी ग्रामीण व दलित जीवनाचे चित्रण अतिशय प्रभावीपणे केले आहे. शिवाय त्यांनी विविध प्रवृत्तींचेही दर्शन घडवले आहे. त्यातून त्यांचा कथानायक व्यक्ती ऐवजी प्रवृत्ती होऊन येताना दिसतो. त्यांची कथा प्रसंगी मिस्कील, विसंगती टिपणारी, विनोदाच्या अंगाने जाणारी होते. कथाकथनकार असाही होवाळ यांचा लौकिक आहे. दलित कथा सृष्टीतील ते एकमेव विनोदी कथाकार होत.''[४] डॉ.सांगोलेकर यांनी होवाळांच्या कथा लेखनातील वेगळेपणा वर भाष्य केले आहे. होवाळांची कथा किती विविधात्मकतेत साकार होते ते स्पष्ट होते.

## समारोप :

सरतेशेवटी असे सांगता येते की, दलित कथा लेखनात अनेक कथाकारांनी आपापल्या कथा लेखनातून योगदान देऊन दलित समाजाचे वास्तव चित्रित करण्याबरोबर दलित समाजात होणाऱ्या बदलाला हे साकार केले आहे. त्यांच्या समकालीन कथाकारांनी वास्तवाचे विद्रोही स्वरूप शब्दबद्ध केले आहे. परंतु, होवाळ मात्र अगदी सहज सोप्या पद्धतीने या समाज वास्तवावर भाष्य करतात. एवढेच नव्हे, तर दलित कथेला वर्ज असणारा विनोदही होवाळांच्या रूपाने प्रथमत:च मराठी दलित कथेत येतो. म्हणून वामन होवाळ यांच्या कथांतून चित्रीत होणाऱ्या सामाजिक जाणीवा या सबंध मानव जातीच्या जाणिवा ठरतात.

## संदर्भ :

१. डॉ.रावसाहेब कसबे, आरसपानी, जयदीप प्रकाशन, मुंबई, प्र.आ.२०१३, पृ.११७.
२. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, तत्रैव, पृ.११३.
३. राजा ढाले, येळकोट, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, द्वि.आ.२०१२, प्रस्तावना.
४. डॉ.अविनाश सांगोलेकर, दलित साहित्य : उद्‌गम आणि विकास, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्र.आ. २०१०,पृ.८२.